



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २६ फेब्रुवारी २०२५ | अंक ७९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# तुम्ही १४४ लावा नाही तर १४५ लावा!
## मस्साजोगमधून जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

### एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असते तर

आता एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असते तर या प्रकरणाचा निपटारा झाला असता, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. शिंदे साहेबांनी काम केलं, गाव खेड्यात शब्द असतो पहिला सरपंच होता खूप चांगलं काम होतं, दुसरा आल्यावर त्याच्यापेक्षा चांगलं काम केलं तर लोक म्हणतात पहिल्या सरपंचापेक्षा त्यानं चांगलं काम केलं. शिंदेंचा कालखंड आम्ही बघितला, त्यांनी आंदोलनाला यशाकडे नेलं. सगळ्या जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम केलं, पण तुम्ही माणसं मरून सुद्धा न्याय देत नाहीत, माणसं मरून देखील आंदोलन करावं लागत आहे, असा हल्लाबोल यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेला दोन महिने उलटून गेले आहेत. मात्र अद्यापही या प्रकरणातील आरोपींना शिक्षा झालेली नाही, तसेच एक आरोपी फरार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर संतोष देशमुख यांचं कुटुंब आणि मस्साजोगच्या ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केलं आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील आज या आंदोलनाला भेट दिली. या भेटीनंतर सरकारवर हल्लाबोल करताना मनोज जरांगे पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. दरम्यान



पुढे बोलताना संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात नियुक्त करण्यात आलेल्या एसआयटी, सीआयडीला तपासाचं स्वातंत्र्य नाही असा आरोप देखील त्यांनी केला आहे. त्यांना जर तापासाचं स्वातंत्र्य असतं तर आज बीडचं अर्ध जेल भरलं असतं. दीडशे ते दोनशे सहआरोपी झाले असते. त्यामुळे हे सत्य आहे की, तपास यंत्रणेला स्वातंत्र्य नाही, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, मंत्री, आमदार, खासदार यांना वाटत असेल आम्ही खूप हुशार आहोत, पण जनता तुमच्यापेक्षाही हुशार आहे, सरकारचा छुपा अजेंडा सुरू आहे. गोड बोलून तीन महिने घातले असा आरोपही यावेळी जरांगे पाटील यांनी केला आहे. उपोषणकर्त्यांच्या जीवाला धोका झाला तर गाठ मराठ्यांसोबत आहे. इथे जर आसपास काही झालं तर ती जबाबदारी गावक-यांची नाही. तुम्ही १४४ लावा नाहीतर १४५ लावा, तुमच्या हातात सत्ता आल्यावर तुम्ही लोकशाही मारून टाकली का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केला आहे. हत्या झाली आहे, तुम्ही म्हणता एकालाही सोडणार नाही, तुम्ही नेमकं कोणाला धरलं? ते आधी आम्हाला सांगा, जे अटक झाले आहेत , ते स्वतःहून आले आहेत, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, तुमचं सरकार असूनही कुटुंबीयांना उपोषणाला बसण्याची वेळ येतीये ही गंभीर बाब आहे. तुम्ही प्रत्येक वेळेस गोड बोलून देशमुख कुटुंबीयांना वेठीस धरू शकत नाही. तुमच्या राजकीय हेतूसाठी देशमुख कुटुंबियांचा दुस-यांदा बळी घेऊ नका, अजूनही चाटेचा मोबाईल सापडला नाही, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेलं आश्वासन पाळलं असतं तर बीडचं अर्ध जल भरलं असतं.

## मस्साजोग अन्नत्याग आंदोलनाचा आज दुसरा दिवस
### आंदोलकांच्या जिवितास धोका झाला तर मात्र राज्यातील मराठ्यांशी गाठ -मनोज जरांगे

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेला अष्ठ्याहत्तर दिवस झाले तरी फरार कृष्णा आंधळे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले नाही. देशमुख कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्यांची पूर्तता करण्यात आली नाही. त्यामुळे अखेर ठरल्याप्रमाणे देशमुख कुटुंबीय व ग्रामस्थांनी मंगळवारी (ता. २५) अन्नत्याग आंदोलन मस्साजोग येथील महादेव मंदिर परिसरात सुरू केले.आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे . वडीलांना न्याय मिळवून देण्यासाठी बारावीची परीक्षा सुरू असताना संतोष देशमुख यांच्या वैभवी या लेकीचा कुटुंब व ग्रामस्थांसह अन्नत्याग आंदोलनात सहभाग आहे. तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्येच्या घटनेला अष्ठ्याहत्तर दिवस उलटून गेले आहेत. रास्तारोको, जलसमाधी, पाण्याचा टाकीवर चढून आंदोलन करूनही न्याय मिळत नाही. त्यामुळे संतप्त मस्साजोग ग्रामस्थांनी बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा निर्णय घेतला. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एक आरोपी अद्यापही फरार आहे. तसेच या गुन्ह्यातील आरोपींना मदत करणाऱ्यांचे पुरावे उपलब्ध होऊनही अद्याप सहआरोपी करण्यात आले नाही. त्यामुळे देशमुख कुटुंबीय व मस्साजोग ग्रामस्थांनी मंगळवारी सकाळी महादेव मंदिर परिसरात बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला मराठा आंदोलक मनोज जरांगे, आमदार संदीप क्षीरसागर, रमेशराव आडसकर व भागचंद महाराज झांजे यांनी भेट दिली. यावेळी बोलताना आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, या दुर्दैवी हत्या प्रकरणी जिल्ह्यातील विरोधी व सत्ताधारी आमदारांनी विधानसभेत आवाज उठविला. मात्र या गुन्ह्याचा निःपक्षपाती तपास होण्यासाठी नैतिक जबाबदारी स्वीकारून मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याचा पुनरुच्चार केला.पुरावे मिळूनही आरोपींना मदत करणारांना सहआरोपी का केले जात नाही? असा प्रश्न उपस्थित केला. तर यावेळी बोलताना



मनोज जरांगे म्हणाले, संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासात काय प्रगती झाली आहे, हा चिंतनाचा विषय झाला आहे. सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीचा विषय हा साधा असूनही तो शासनाला सोडवता आला नाही. फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात न्यायासाठी अन्नत्याग आंदोलन करण्याची वेळ येणे ही दुर्दैवी बाब आहे.

## गृहनिर्माण संस्थांवर अवसायक नियुक्ती पॅनल बाबत

बीड-प्रतिनिधी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग यांचेकडुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ/ ७८/ ७८ अ अन्वये गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणा-या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे पॅनेल तयार करण्यासाठी अर्ज शासनातील राज्य शासनाचे गट अ व ब प्रवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी / मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. अँड ए)/ उच्चतम सहकार पदविका (एच.डी.सी.) धारक / चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.) / इन्स्टीयूट ऑफ कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकाऊटंट (आय.सी.डब्ल्यू.ए)/ कंपनी सेक्रेटरी (सी.एस) / सहकार खात्यातील प्रशासन/लेखाप्रशासन/ विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी /नागरी कर्मचारी सहकारी बँकांमध्ये व्यवस्थापक / कायद्याचे पदवीधारक यांचेकडुन मागविण्यात येत आहे. अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था लातूर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका बीड व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, गेवराई, माजलगाव, परळी (वै), अंबाजोगाई, केज, धारुर, वडवणी, पाटोदा, आष्टी व शिरुर (कासार) जि.बीड या कार्यालयात दि.२४.फेब्रुवारी.२०२५ ते दि.२८.फेब्रुवारी २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. याबाबतची जाहिर सूचना उपरोक्त नमूद कार्यालयांच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे कळवले

## घातक हत्यारानी मारहाण करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता : अॅड गणेश हनुमंत तावरे

बीड (प्रतिनिधी):- मा. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायलयात दिनांक २४/२/२०२५ रोजी फिर्यादी व त्याचे पत्नी व मुलगी यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा लोखंडी चैन व चाकूने मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या त्या प्रकरणी रमेश भिकाजी थोरात गणेश भिकाजी थोरात व इतर आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. सदरच्या घटनेची केस ची हकीकत अशी की, मौजे मोची पिंपळगांव येथे दिनांक ०१.०२.२०२० रोजी दुपारी १५.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हा त्याचे घरी असतांना रमेश भिकाजी थोरात व गणेश भिकाजी थोरात इतर यांनी फिर्यादीची मुलगी हिस पुण्याहुन घेवुन आल्याचे कारणा वरुन तिच्या हातातील पेट्रोलची बॉटल मुलीच्या अंगावर ओतले त्यानंतर गणेश भिकाजी थोरात याने त्याचे हातातील चाकुने फिर्यादीच्या हातावर मारुन जखमी केले. तसेच रमेश भिकाजी थोरात याने लाकडी दांडयाने व लोंखडी चैनने फिर्यादीचे पाठीत मारहान केली. तसेच फिर्यादीची पत्नी हिस रमेश थोरात याने लाकडी दांड्याने हातावर मारल्याने तिच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच



यातील आरोपीतांनी फिर्यादी व त्याचे पत्नी व मुलगी यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा लोखंडी चैन व चाकूने मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या त्या प्रकरणी रमेश भिकाजी थोरात गणेश भिकाजी थोरात व इतर विरुध्द गु.र.क्र.११/२०२० कलम ३२६,३२३,५०४,५०६,३४ भा.दं.वि प्रमाणे दोषारोप मा कोर्टात दाखल झाले होते न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले. सदर दोषारोपपत्र ठउउ/२४५/२०२० पडला. सदर दोषारोपाच्या अनुषंगाने ना. न्यायालयामध्ये फिर्यादी तसेच प्रत्यक्षदर्शनी साक्षीदार व इतर साक्षीदारांची महत्त्वाची साक्ष नोंदवण्यात आली. सदर साक्ष पुराव्यामध्ये आरोपीच्या बाजुने घेण्यात आलेला बचाव मा. न्यायालयाने ग्राह्य धरून सबळ पुराव्या अभावी मा. न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने अॅड गणेश हनुमंत तावरे यांनी भक्कम बाजु मांडली.

## प्रभू वैद्यनाथ सर्वांचं भलं करोत; महाशिवरात्री निमित्त परळीत येणाऱ्या सर्व भाविकांचे स्वागत -धनंजय मुंडे


परळी ।प्रतिनिधी परळी स्थित प्रभु वैद्यनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असून, शिवपुराणात वैद्य नाथ या अर्थाने या पाचव्या ज्योतिर्लिंगास अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाशिवरात्रीचे पवित्र पर्व हे सर्व शिवभक्तांच्या आयुष्यामध्ये उत्तम आयुरारोग्य व समृद्धी घेऊन येवो, प्रभू वैद्यनाथ सर्वांचं भलं करो, अशी प्रार्थना राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी केली आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने दरवर्षी



लाखो भाविक देशभरातून परळी नगरीत दाखल होऊन दर्शन घेत असतात. याही वर्षी लाखो भाविक परळी नगरीत दाखल होताना दिसत असून धनंजय मुंडे यांनी सर्व शिवभक्तांचे प्रभुवैद्यनाथांच्या परळी नगरीत स्वागत करत असल्याचे म्हटले आहे. महाशिवरात्री महोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने फराळ व फळे वाटपासह यात्रा महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी नात प्रतिष्ठानच्यावतीने यात्रा महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याचाही लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले आहे. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विविध सुविधा, पार्किंग, वाहतूक, स्वच्छ पिण्याचे पाणी यांसह विविध सुविधांच्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांनी नगर परिषद, तहसील व पोलीस प्रशासनास योग्य सूचना देखील केल्या आहेत.

## महाशिवरात्री निमित्त उत्तरेश्वर पिंपरी येथे सर्व रोग निदान शिबीर व रक्तदान शिबीराचे आयोजन

केज/प्रतिनिधी विश्व हिंदू परिषद,देवगिरी प्रांत व श्री संत ज्ञानेश्वर माऊली उत्तरेश्वर पिंपरीकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,माऊली मंदिर श्रीक्षेत्र उत्तरेश्वर पिंपरी यांच्या संयुक्त विधमाने महाशिवरात्री निमित्त सर्व रोग निदान शिबीर व भव्य रक्तदान शिबीर दि.२६ फेब्रुवारी व दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री माऊली मंदिर श्री क्षेत्र उत्तरेश्वर पिंपरी ता.केज जिल्हा बीड येथे आयोजन करण्यात आले आहे.श्री उत्तरेश्वर महादेव मंदिर हे भगवान शंकराचे जागृत देवस्थान आहे.हे मंदिर महाराष्ट्रातील केज तालुक्यातील उत्तरेश्वर पिंपरी (हनुमंत पिंपरी) या ठिकाणी आहे.सत्ययुगात राम-लक्ष्मण दंडकारण्यात फिरत असताना प्रभू रामचंद्राचा मुक्काम या ठिकाणी पडला. सकाळच्या वेळीपूजेसाठी रामाने बाण मारून विहीर तयार केली.विहिरीतील पाणी घेऊन वाळूचे शिवलिंग तयार करून पूजा केली.त्या ठिकाणी रावण जटायू यांचे युद्ध झाले.जटायूचा मृत्यू झाला.रामाने जटायूची उत्तरक्रिया केली.म्हणून या शिवलिंगाचे उत्तरेश्वर असे नाव पडले.या ठिकाणी महाशिवरात्री निमित्त भव्य दिव्य अशी यात्रा भरते.यानिमित्ताचे औचित्य साधून विश्व हिंदू परिषदेने सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिर तज्ञ व नामांकित डॉक्टरांच्या मार्गदर्शना खाली आयोजित केले आहे.डॉ.जीवन राजपूत संचालक जे जे प्लस हॉस्पिटल अदालत रोड छत्रपती संभाजी नगर, मो.नं.९४०४३०००४४. डॉ.विवेकानंद नारायण गिरी बालरोगतज्ञ,७५८८४२२७५१.डॉ. गजानन सारंगकर जनरल फिजिशियन ९४२०२०११२३. संपर्क महेश दोरवट पाटील धर्मादाय विभाग देवगिरी प्रांत मो.नं.९०६७१९७०४५. हृदयविकार तज्ञ डॉ.पंकज जोशी चीफ इंटरनॅशनल कार्डिओलॉजिस्ट, डॉ.प्रशांत पाटील सीईओ अँड मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर, किडनी विकार तज्ञ :- डॉ.गौरी कुलकर्णी एमबीबीएस डी एन बी मेडिसिन डी एन बी न्यूरोलॉजी,डॉ. चेतन तीकर एमबीबीएस एम एस एम सी एच युरोलॉजी, बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञः-डॉ.प्रतीक्षा मुळे एमबीबीएस एम एस डी एन बी गायनिक अँड ओबीएसटी फेलोशिप इन अल्ट्रासोनोग्राफी, डॉ. सुनील जाधव एमबीबीएस डीसीएच एमडी



कन्सल्टंट फेडरेशन अँड न्यूनेटोलॉजिस्ट. मेंदू विकार तज्ञ :- डॉ.संतोष उनवणे एमबीबीएस एम एस जनरल सर्जरी,डॉ. अतुल डोईफोडे एमबीबीएस डीएनबी पीजीओ चैन्नई. दंत रोग तज्ञः-डॉ.प्रदीप सोनवणे बीडीएस जनरल विभागः- डॉ. नांगरे जनरल फिजिशियन,डॉ.विभुते जनरल फिजिशियन, डॉ.भागवत राऊत जनरल फिजिशियन,डॉ.सुरेश रणदिवे जनरल फिजिशियन,समता फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने दि.२७ फेब्रुवारी रोजी नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.व रक्तदान शिबीरासाठी श्री. सत्य साई ब्लड सेंटर सिडको छत्रपती संभाजी नगर यांनी सहभाग नोंदवला आहे.

संपादकीय

## हर हर महादेव चे सामर्थ्य !

२६ फेब्रुवारी म्हणजे महाशिवरात्रीच्या दिनी प्रयागराज येथील महाकुंभात शेवटचे अमृत स्नान पार पडणार आहे. त्रिमूर्तींपैकी एक भगवान शिव हिंदूंचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. सृष्टीचे निर्माणकर्ता श्री ब्रह्मदेव, पालनकर्ता श्री विष्णुदेव आणि संहारकर्ता श्री महादेव आहेत. म्हणूनच मृत्यू किंवा मोक्ष यावर श्री महादेवाचा अंकुश आहे, असे म्हटले जाते. गतजन्मातील पापकर्मांमुळे आपणास या जन्मात प्रारब्ध म्हणून मानसिक आणि शारीरिक व्याधी भोगाव्या लागतात या सर्वांपासून मुक्ती देण्याचे कार्य श्री महादेव करतात, अशी अनेकांची धारणा आहे. शिवाचे भारतासह जगभरात कोट्यवधी भक्त आहेत. शिवाच्या नियमित उपासनेने भय, दुःख, रोग,दारिद्र्य नाहीसे होऊन जीवनात सुख शांती आणि समृद्धी लाभते असा श्रद्धाळुंचा समज आहे. शिवाचे व्रत म्हणून अनेक जण सोळा सोमवार करतात, श्रावण महिन्यात सोमवारी निराहार राहतात. महाशिवरात्रीचे व्रत करतात. शिवाचे अघोरी उपासकही आहेत जे स्मशानात जाऊन शिवाची उपासना करतात. या सर्वांचे दर्शन आपल्याला यंदाच्या महाकुंभाच्या निमित्ताने झाले. ङ्गओम नमः शिवायफ हा शिवाचा मंत्र आहे तर ङ्गहर हर महादेवफ हा जयघोष आहे. ज्योतिर्लिंगांच्या स्थानी किंवा शिवाच्या मंदिरांत गेल्यावर ङ्गहर हर महादेवफ चा जयघोष आपल्याला हमखास ऐकायला मिळतो. ङ्गहर हर महादेवफ या जयघोषात प्रचंड सामर्थ्य आहे, त्यामुळेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा स्वराजाच्या सैन्याचा म्हणजेच मावळ्यांचा जयघोष महर हर महादेवफ्च ठेवला होता. या जयघोषाची त्यावेळेस प्रचंड दहशत होती. ङ्गहर हर महादेवफ चा घोष कानी पडताच स्वराज्याचे शत्रू यवन थरथर कापू लागत. याच ङ्गहर हर महादेवफ घोषाचे महत्व आता विज्ञानाच्या स्तरावही सिद्ध झाले आहे. वाराणसीतील आयएमएस बीएचयूच्या फॅकल्टी ऑफ डेंटल सायन्सचे डॉक्टर तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांवर आगळ्या पद्धतीने उपचार करत आहेत. या ठिकाणी शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना दोन्ही हात वर करून ङ्गहर हर महादेवफ चा जयघोष करण्यास सांगितले जाते. या अनोख्या उपचारामुळे रुग्णांना अवघ्या दोन महिन्यांत आराम मिळतो. डॉक्टरांनी तोंडावर शस्त्रक्रिया करताना रुग्णांच्या छातीचे काही स्नायू कापून त्यांचे रुग्णांच्या शस्त्रक्रिया केलेल्या भागावर रोपण केले असता रुग्णांच्या हाताची आणि खांद्यांची हालचाल पूर्णतः थांबल्याचे लक्षात आले. ही हालचाल पूर्ववत होण्यासाठी फिजिओथेरपीचे नेहमीचे उपचार करूनही विशेष फरक पडला नाही; मात्र याच रुग्णांनी ङ्गहर हर महादेवफ चा जयघोष करत हात वर करण्याचा प्रयत्न केल्यावर हळूहळू अवयवांची हालचाल होऊ लागली आणि रुग्णांनाही आराम मिळू लागला. या आगळ्या वेगळ्या प्रयोगाची कर्करोगाच्या ३०० हुन अधिक रुग्णांवर चाचणी करण्यात आली, त्यापैकी ८० टक्याहुन अधिक लोकांना विस्मयकारक आराम मिळाला, ज्या रुग्णांनी प्रतिदिन गांभीर्याने ही थेरेपी केली त्यांना दोन अडीच महिन्यांत त्यांचे हात पूर्णतः वर करता येऊ लागले. फिजिओथेरपीवर लाखो रूपये खर्च करूनही जो परिणाम मिळू शकला नाही तो केवळ ङ्गहर हर महादेवफ च्या जयघोषाने अवघ्या दोन महिन्यांत मिळाला. येथील विद्याशाखा प्रमुख एच. सी. बरनवाल यांनी सांगितले कि, वैद्यकीय शास्त्रात प्रथमच ङ्गहर हर महादेवफ ही थेरपी म्हणून जगभरात स्वीकारली गेली आहे. विद्याशाखेचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अखिलेश सिंह यांनी सांगितले कि ङ्गहर हर महादेवफच्या घोषाने आध्यात्मिक शक्ती निर्माण होते जिचा आध्यात्मिक स्तरावर लाभ, तर होतोच शिवाय ही एक अशी फिजिओथेरपी आहे ज्यामध्ये अधिक श्रम करावे लागत नाहीत. काशीच्या लोकांना नेहमीच्या बोलण्यात ङ्गहर हर महादेवफ चा जयघोष करण्याची सवय आहे; मात्र ही सवय म्हणजे सर्वात अधिक परिणामकारक फिजिओथरपी आहे. हे त्यांनाही माहीत नाही. छत्रपती शिवरायांनी मूठभर मावळ्यांच्या बळावर पाच पातशाह्यांना धूळ चारली. हजारो मुघल सैन्यावर काही शेकडा मावळे तुटून पडत आणि त्यांच्यावर विजयही मिळवत. त्यांना ही शक्ती आणि सामर्थ्य देण्याचे काम ङ्गहर हर महादेवचाफ जयघोष करत असे हे आता लक्षात येते. भगवंताच्या नामामध्ये किती सामर्थ्य आहे हे आता विज्ञानाच्या पातळीवरही सिद्ध होऊ लागले आहे. कलियुगामध्ये समस्त संतांनीही नामजपाचे महत्व विशद केले आहे. नियमित नामजपाने मनाची शक्ती वाढून मन एकाग्र होते, विद्यार्थ्यांना अभ्यासात मन एकाग्र करण्यासाठी नामजप एक प्रभावी उपाय आहे. व्यावहारिक जगातील स्पर्धेमुळे ताण आणि नैराश्य यांनी अनेकांना ग्रासले आहे. मनावरील ताण नाहीसा करण्यासाठीही नियमित नामजप गुणकारी आहे. जिथे जिथे देवतेचे नाम आहे तिथे त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती एकवटलेली असते असे धर्मशास्त्र सांगते त्यामुळे नामजपाच्या आध्यात्मिक स्तरावर लाभ तर होतोच शिवाय मानसिक स्तरावरही होतो. ज्या नामाने दरोडेखोर वाल्याचा वाल्मिकी झाला त्या नामापुढे आपले साधे सुधे आजार आणि रोग एवढे मोठे आहेत का ?

# महाशिवरात्री ...ॐ नमः शिवाय

कैलासराणा शिवचंद्रमौळी । फणींद्र माथां मुकुटी झळाळी । कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।। ङ्गॐ नमः शिवायफ या मंत्रामध्ये सर्व प्रकारचे दुःख नष्ट करण्या ची शक्ती आहे. ङ्गशिवफ म्हणजे पापाचा नाश करणारे, त्या आधी असणारा मनमःफ हा शब्द मोक्ष प्रदान करणारा आहे. उमा-महेश्वर हा देवादी देव महादेव आहे. मनमः शिवायफ या पाच अक्षरी मंत्रात अद्भुत सामर्थ्य असून तो जगाचे कल्याणासाठी सार्थ ठरला आहे. शिवशंकराला देवांचा देव महादेव असे म्हणतात. महादेवाचे मंदिर नाही, असे गाव भारतात शोधून देखील सापडणार नाही. देशभरातील प्रत्येक प्रांतात शिवशंकराची आराधना केली जाते. महर हर महादेव...फ, अशा जयघोषात शिवाचे भाविक तल्लीन होऊन जातात. शिव नामस्मरण करून भाविक चराचरात सामावलेल्या शिवशंकराचा धावा करीत असतात. शिव हे दैवत मंगलमय, कल्याण करणारे असून त्यांच्यावर भाविकांची अपार श्रध्दा आहे. शिवकृपेने जीवनात कोणत्याच प्रकारचे दुःख येत नाही, अशी श्रद्धा आहे. शिव भोळा सांभ आहे. तो फार लवकर पावतो अशीही श्रद्धा असते. अशा आपल्या लाडक्या शिवाचे व्रत -शिवरात्र व्रत. माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथी महाशिवरात्र म्हणून पाळली जाते. या दिवशी उपवासाचे व्रत करतात. भगवान शिवाची आराधना आणि प्रार्थना करून दुसर्या् दिवशी व्रताची सांगता केली जाते. शिवलीलामृत मध्ये एक कथा आहे.... दिवस महाशिवरात्रीचा. एक पारधी शिकारीसाठी जंगलात जातो. एका जलाशया जवळ झाडावर बसतो. पण दिवसभर वाट पाहून ही त्याला शिकार मिळत नाही. कंटाळतो. तेवढयात त्या जलाशयाजवळ हरिणाचा एक कळप पाणी पिण्यासाठी येतो.. पारधी खुश होऊन धनुष्याची दोरी खेचतो. तेवढ्यात त्या कळपातील मुख्य हरीण समोर येते विनवणी करू लागते. हे राजन शिकार करणे हा तुझा धर्म आहे. तसेच माझीही काही जबाब दारी आहे. मी माझ्या जबाब दारी पूर्ण करून सकाळी येतो . मला मार. पारध्याला दया येते तो परवानगी देतो. रात्री पारधी झाडावरच थांबतो. दूरवर एका शिव मंदिरात भजन कीर्तन चालू असते. ते त्याच्या कानावर पडते. मॐ नमः शिवाय जप चालू असतो . तो ही नकळत जप करू लागतो. सहज झाडाची पाने खाली टाकू लागतो . ती पाने नेमकी बेलाची असतात. खाली महादेवाची पिंड असते त्यावर बेलपत्र पडतात. त्याला उपवास घडतो तो ही नकळत. सकाळी हरिणाचा कळप पुन्हा हजर. मुख्य हरीण म्हणते मला मार. तेवढ्यात त्या हरिणाची पत्नी म्हणते मला मार . मला पत्नी व्रत करू दे. मुले मानतात नाही आम्हांला मार. त्यांच्यात चढाओढ चालू होते.. पारध्याला दया येते . तो सर्वांना सोडतो. नकळत शिवव्रत व पूजा झाली म्हणून शिवशंकर प्रसन्ना होतात. सर्वांचा उधार करतात. हरिणांना मृग नक्षत्र म्हणून व पारध्याला व्याघ्रनक्षत्र हे आढळ स्थान आकाशात मिळते. ङ महाशिवरात्रीफ म्हणजे काय ? : पृथ्वीवरील एक वर्ष म्हणजे स्वर्गलोकातील एक दिवस. शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. शिवाच्या विश्रांती घेण्याच्या काळाला ऋमहाशिवरात्रीफ असे म्हणतात. शिवाच्या विश्रांतीच्या काळात शिवतत्त्वाचे कार्य थांबते, म्हणजेच त्या काळात शिव ध्यानावस्थेतून समाधिअवस्थेत जातो. शिवाची समाधिअवस्था म्हणजे शिवाने स्वतःसाठी साधना करण्याचा काळ. त्या काळात विश्वातील तमोगुण शिवतत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे विश्वामध्ये तमोगुणाचे प्रमाण किंवा वाईट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो. त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून शिवतत्त्व आकृष्ट करून घेण्यासाठी महाशिवरात्रीचे व्रत करावे. अशा पद्धतीने पुराण कथेसहित शत्रोक्त आधारही आहे. शिवरात्रीच्या दिवशी एकभुक्त रहावे म्हणजे एकदाच काही उपवासाचे खावे. काही लोक अनेक पदार्थ करूनखात राहतात. असो. शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्या, असे विधान आहे. त्यांना ऋयामपूजाफ असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालून अनुलेपन करावे. पंचगव्य म्हणजे गायीचे दूध, तूप, शेण, गोमूत्र आणि दही लावून शिवलिंगाला अभिषेक केला जातो. त्यानंतर दूध, दही, तूप, मध आणि साखर या पंचामृताने शिवलिंगाला लेपन केले जाते. त्यानंतर धोत्रा आणि बेलाची पाने तसेच पांढरी फुले वाहून पूजा केली जाते. मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वहा शंकरासी । काशीपुरी भैरव विश्व तारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।। .. तांदुळाच्या पिठाचे २६ दिवे करून त्यांनी शिवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावेत. प्रत्येक पूजेचे मंत्र वेगवेगळे असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. शिवस्मरणात जागरण करावे. पहाटे स्नान करून पुन्हा पूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे. शिवाला बेलपत्र प्रियः एका कथेनुसार.. एकदा विष्णुची पत्नी लक्ष्मीने श्रावण मासात शिवलिंगावर प्रतिदिन १००१ पांढरे कमळाची फुले वाहण्याचे व्रत करण्यामचे ठरविले. लक्ष्मीने परडीत मोजून कमळे ठेवली. मात्र मंदिरात पोहचल्यानंतर तीन कमळाची फुले कमी भरली. त्याचे लक्ष्मीला आश्चर्य वाटले. त्यानंतर तिने फुलांवर पाणी शिंपडले आणि चमत्कार झाला. फुलांमधून एक रोपटे बाहेर आहे. त्याला त्रिदलासारखी पाने त्याला होती. ते बेलाचे रोपटे होते. त्यावरील बेलपत्र लक्ष्मीने तोडून शिवलिंगवर वाहिली. लक्ष्मीच्या भक्तिमधील सामर्थ्य पाहून भोलेनाथ प्रसन्न झाले व तेव्हापासून शिवशंकराला बेलपत्र प्रिय आहे. भक्तावर तत्काळ प्रसन्न होणारा शिवशंकर खरोखरच महादेव आहे. शिवाचे ध्यान ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारूचंद्रावतंसं रत्नाकल्पोज्वलांग परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम । पद्मासीनं समन्तात स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं विश्वाद्यं विश्वबीजं निखिलभय हरं पंचवक्त्रं त्रिनेत्रम । ॐ नमः शिवाय,ध्यानार्थे अक्षतपुष्पाणि समर्पयामि । ॐ नमः शिवाय, पाद्यं, अर्घ्यं, आचमन्यं स्नानं समर्पयामि। जे जमेल ते करावे . बस जे कराल ते श्रद्धेने करावे ही विनंती, श्री गुरुचरित्र ४४ व्या अध्यायात एक कथा आहे. किरातदेशीं म विमर्षण म राजा व कुमुद्वती राणी यांच्या पूर्वजन्माची कथा. विमर्षण म राजा पूर्वजन्मी कुत्रा असतो.. एक दिवस त्याला खायला मिळत नाही उपवास घडतो. तो अन्नाच्या शोधात शिव मंदिरी जातो. त्याला सारे हाकलत राहतात. तो पुढे पळत राहतो त्या निमिताने मंदिराला तीन प्रदक्षिणा करतो. शिव पूजा पाहतो. तो त्या रात्री मरतो पण शिवरात्र व्रत नकळत होतो. तेवड्याने त्याला नवा जन्म राजाचा मिळतो. त्याची पत्नी कुमुद्वती राणी पूर्वजन्मी कबुतर असते. तिच्या तोंडातला घास पाहून त्याच्या मागे घार लागते. कबुतर घाबरून जोरात उडू लागते. नकळत शिवमंदिराला प्रदक्षणा करते. घार तिला मारते. शिव पूजा पाहून ती उपवास करून मारते.

# ट्रम्पच्या एकाकी निर्णयाने जगात अस्थिरतेचे वातावरण; यामुळे जगाची दैना अवस्था!

२० जानेवारी २०२५ रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यापासून त्यांनी केलेली विधाने व निर्णय पहाता त्यांचा मानसिक तोल ढासळला की काय असल्याचे मानले जाते.डोनाल्ड ट्रम्पच्या हातात अमेरिकेची सुत्रे येताच त्यांनी गेल्या एक महिन्यात असे निर्णय घेतले की जगातील अनेक देशांच्या भुवया उंचावल्या व चिंतेत पडले.त्यामुळे गेल्या महिन्याभरातील निर्णयाचा आढावा घेतला असता आगामी येणाऱ्या चार वर्षांचा कालखंड हा जगासाठी प्रचंड उलथापालथीचा आणि कलाटण्यांचा असणार आहे याचे स्पष्ट संकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत घेतलेल्या निर्णयांवरून स्पष्ट दिसून येते.डोनाल्ड ट्रम्प सत्तेत येताच जगातील संपूर्ण शेअय मार्केट धाराशाही झाले व सोन्याचे आभाळाला जाऊन टेकले.यामुळे उद्योग जगत सुध्दा ट्रम्पच्या निर्णयाने भरडल्याचे दिसून येते.अमेरिका सुपर पॉवर आहे ही बाब सत्य आहे यात दुमत नाही.परंतु ट्रम्प सरकार जे काही निर्णय घेत आहेत ते फक्त स्वतःच्या फायद्यांचे घेत असल्याचे दिसून येते. अमेरिका व्यापारी राष्ट्र आहे व जगातील एक महत्वपूर्ण देश असल्यामुळे त्यांनी संपूर्ण जगाचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यापासुन भारताला लक्ष्य बनविण्याचे धोरण सुरू केल्याचे दिसून येते. राजकीय शिष्टाचार मोडीत काढून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत त्यांनी केलेली विधाने पहाता ट्रम्प यांच्या मनात खरोखरच भारताबद्दल प्रेम व आदर आहे की नाही यावर सध्या प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. ट्रम्पच्या वागण्यावरून असे वाटते की भारताला अपमानित तर करत नाही ना!डोनाल्ड ट्रम्प यांच्या चुकीच्या निर्णयाची झळ भारतालाही सोसावी लागणार आहे.भारतात अमेरिकेन वस्तूंवर सरासरी २९ टक्के आयात शुल्क आकारले जाते.भारताच्या वस्तूंवर मात्र अमेरिका तेवढेच शुल्क आकारत नाही.यात वाहन उद्योग, औषध उद्योग, डेअरी उत्पादने, कृषीमाल यांसह सर्वच क्षेत्रात प्रचंड आयात शुल्क आकारले जात असल्याने अमेरिकन वस्तूंना भारतीय बाजारपेठेत वावच नाही.डोनाल्ड ट्रम्पचे तडकाफडकी निर्णय पहाता पंतप्रधान मोदींनी तत्काळ अमेरिका दौऱ्याची आखणी केली व ट्रम्प यांची भेट घेऊन त्यांना सांगण्यात आले की इतर देशांवर ज्याप्रमाणे आपण निर्बंध लावले आहेत.त्याप्रमाणे भारतावर एकतर्फी काही निर्बंध लावू नयेत म्हणजेच आयात शुल्क लावू नये हा प्रमुख उद्देश मोदींचा होता.ट्रम्पचे धोरण म्हणजे आपल्या वस्तू दुसऱ्या देशात कमी टेरिफमध्ये विकायच्या आणि त्या देशांच्या वस्तूंवर भरमसाठ शुल्क आकारायचे हा प्रकार दिर्घकाळ सुरू ठेवता येणार नाही असे अनेक देशांचे म्हणने आहे.सध्याच्या परिस्थितीत अमेरिका व्यापारी चाल खेळुन सौदेबाजी करतांना दीसत आहे.भारताच्या बाबतीत सांगायचं म्हणजे भारत-अमेरिका व्यापारातून तूट कमी करण्यासाठी ट्रम्प यांच्या कडून दोन प्रस्ताव मांडण्यात आले आहे.एक म्हणजे अमेरिकन तेल व एलएनजीची आयात भारताने वाढवावी आणि दुसरे म्हणजे अमेरिकन संरक्षण साधनसामुग्री व शस्त्रांची खरेदी करावी म्हणजेच अमेरिका व्यापार करतांना स्वतःच्या फायद्यांवर जास्त जोर देत असल्याचे दिसून येते.अमेरिका भारताला जेवढा चांगला म्हणतो तेवढाच वाईटही म्हणतो ही बाब ट्रम्पच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते.ट्रम्प म्हणतात की तत्कालीन बायडेन प्रशासनाने भारताला निवडणुकीत मदतीसाठी युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट अर्थात (यूएसएआयडी) ने १.८ कोटी अमेरिकी डॉलरचे अर्थसहाय्य दिले.या निधीची भारताला गरज नव्हती,

# ना.पंकजाताई मुंडे महाकुंभमेळ्यात सहभागी ; आई प्रज्ञाताईसह त्रिवेणी संगमात केले पवित्र स्नान

मुंबई-प्रतिनिधी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे (ता.२४) प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात पोहोचल्या. यावेळी त्यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासह त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले. प्रयागराज येथील घाटावर जाऊन त्यांनी संगमात आस्थेची पवित्र डुबकी घेतली. प्रयागराजमधील कुंभमेळ्यात ना. पंकजाताई व यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासह त्रिवेणीच्या संगमात पवित्र स्नान केले. तसेच त्यांनी यावेळी त्रिवेणी संगम येथे आरती आणि प्रार्थना देखील केली. अद्भुत अन् अद्वितीय अनुभव-ना.पंकजाताई अनुभव-ना.पंकजाताई अनुभव-ना.पंकजाताई यावेळी माध्यमांशी बोलतांना ना. पंकजाताई म्हणाल्या, महाकुंभमेळ्यातील पवित्र स्नानाचा आणि इथल्या वातावरणाचा अद्भुत आणि अद्वितीय असा अनुभव मला आला. २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या महाकुंभमेळ्याची तयारी कशी करता येईल याचा अभ्यास आम्ही इथे केला. एवढी प्रचंड गर्दी असूनही प्रयागराजमधील महाकुंभमेळ्याची व्यवस्था अतिशय चोख आणि नियोजनबद्ध आहे त्याबद्दल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व त्यांच्या टीमचे त्यांनी मनापासून कौतूक केले. खरचं, मन भारावून गेले.. हा महाकुंभ यशस्वी करण्यासाठी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपासून ते कॅबिनेट मंत्र्यांपर्यंत सर्व जण खूप परिश्रम घेत आहेत याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. उत्तरप्रदेशच्या पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी केली चर्चा अधिकाऱ्यांशी केली चर्चा अधिकाऱ्यांशी केली चर्चा ना. पंकजाताई मुंडे यांनी उत्तरप्रदेशमधील पर्यावरण आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत देखील या दौऱ्यात चर्चा करून इथल्या पर्यावरण विषयक बाबींचा अभ्यास केला.

# युवकाच्या अवयवदानाने पाच जणांना नवजीवन

## मृत्यूनंतरही अमर एका निर्धाराने पाच जणांना मिळाले नवे आयुष्य

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड -किनवट : ज्या हातांनी कुटुंबाच्या उन्नतीसाठी मेहनत घेतली, तेच हात मृत्यूनंतरही पाच जणांच्या जीवनात प्रकाश आणणारे ठरले. आर्थिक संकटांशी झुंज देणा-या एका ऑटोरिक्षाचालकाच्या तरुण मुलाने मृत्यूनंतर अवयवदान करून पाच कुटुंबांना नवजीवन दिले.



ओमकार अशोक आकुलवार (वय १९, रा. मांडवा, ता. किनवट, जि. नांदेड) हा युवक फर्निचरच्या कामातून कुटुंबाला मदत करत होता. त्याचे वडील, अशोक आकुलवार, ऑटोरिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. ओमकारचे भविष्य उज्ज्वल असताना, एका दुर्दैवी अपघाताने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

### अपघात आणि संघर्ष

शनिवार, २२ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ओमकार आपल्या मित्राच्या वाढदिवसानिमित्त इतर दोन मित्रांसोबत गेला होता. रात्री नऊच्या सुमारास दुचाकीने घरी परतत असताना, बी.पी. कॉलेजसमोरील विसावा ढाब्याजवळ अचानक रस्त्यावर आलेल्या एका प्राण्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याचा दुचाकीवरील ताबा सुटला. त्यामुळे झालेल्या अपघातात तो गंभीर जखमी झाला. डोक्याला जबर मार लागल्याने तो बेशुद्ध पडला. तातडीने गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्याची प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्याला आदिलाबाद येथे मरेफरफ करण्यात आले. आदिलाबाद येथेही प्रकृती अधिक बिघडल्याने त्याला नागपूरच्या मेडिकल ट्रॉमा सेंटरमध्ये हलविण्यात आले. तिथे तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार सुरू असताना टोन दिवस फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. विविध वैद्यकीय चाचण्यांनंतर डॉक्टरांनी ओमकार चा मर्मेंदू मृतफ (ब्रेन डेड) झाल्याचे घोषित केले.

### कर्तव्यभावनेने घेतलेला मोठा निर्णय

अचानक आलेल्या या धक्क्याने कुटुंब हादरले. मात्र, ओमकारच्या वडिलांनी दुःखावर मात करून एक मोठा आणि सकारात्मक निर्णय घेतला. वयवदानाचा ! त्यांच्या संमतीमुळे सोमवारी (दि. २४) दुपारी दोन वाजता ओम कारला व्हेंटिलेटरवरून काढण्यात आले आणि त्याचे अवयव दान करण्यात आले. विभागीय अवयव प्रत्यारोपण समितीच्या सूचनेनुसार, ओमकारची दोन मूत्रपिंडे आणि एक यकृत तातडीने तीन गरजू रुग्णांमध्ये प्रत्यारोपित करण्यात आले. त्याचे डोळे लवकरच गरजूंमध्ये प्रत्यारोपित करण्यात येणार आहेत. त्यामुळे एकूण पाच जणांना नवजीवन मिळाले आहे.मंगळवारी (दि. २५) सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मांडवा येथे त्याच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणा अंतिम संस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई-वडील व एक लहान बहीण असा परिवार आहे.

### मानवतेचा संदेश जिवंत ठेवणारा निर्णय

गरिबीशी झुंज देणा-या एका रिक्षाचालकाच्या मुलाने मृत्यूनंतरही समाजासाठी अमूल्य देणगी दिली. वडिलांनी केवळ आपल्या मुलाला अमर केले नाही, तर एक महत्त्वाचा सामाजिक संदेशही दिलाङ्ग मृत्यूनंतरही आपण कोणाला तरी जीवन देऊ शकतो !ङ्क ओमकारच्या कुटुंबाने घेतलेल्या या निर्णयामुळे पाच घरांमध्ये आनंदाची प्रकाशकिरणे पसरली. हा केवळ अवयवदानाचा निर्णय नव्हता, तर माणुसकीच्या नात्याने दिलेला उज्ज्वल संदेश होता.

# पहिलीच सुपर ओव्हर युपीने गाजवली, आरसीबीचा लाजिरवाणा पराभव

बेंगळुरु-महिला प्रीमियर लीगच्या एका मोठ्या सामन्यात, गेल्या वर्षीच्या चॅम्पियन संघ आरसीबीचा यूपी वॉरियर्सकडून सुपर ओव्हरमध्ये पराभव झाला. सामन्यात, नाणेफेक गमावल्यानंतर आरसीबीने प्रथम फलंदाजी करत १८० धावा केल्या. प्रत्युत्तरात, लक्ष्याचा पाठलाग करताना यूपी वॉरियर्सने निर्धारित २० षटकांत केवळ १८० धावा केल्या. यानंतर, प्रकरण सुपर ओव्हरपर्यंत पोहोचले आणि इथे आरसीबीच्या कर्णधार स्मृती मानधनाच्या एका मोठ्या चुकीमुळे तिचा संघाने जिंकणार सामना गमावला. सुपर ओव्हरमध्ये काय झाले?-सामना १८० धावांवर बरोबरीत सुटल्यानंतर, सुपर ओव्हरमध्ये यूपी संघ प्रथम फलंदाजी करण्यास आला. आरसीबीकडून किम गार्थने सुपर ओव्हर टाकली. गार्थचा षटक उत्कृष्ट होता आणि तिने कोणत्याही चौकाराविना फक्त ८ धावा दिल्या. यानंतर आरसीबी संघ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आला. आरसीबीकडून कर्णधार मानधना आणि रिचा घोष स्वतः प्रथम फलंदाजीला आल्या. यूपी वॉरियर्सकडून सोफी एक्लेस्टोन गोलंदाजी करायला आली. एक्लेस्टोनच्या पहिल्या चेंडूवर रिचा घोषला एकही धाव करता आली नाही. दुसऱ्या चेंडूवर एक धाव आली आणि स्मृती मानधनाने स्ट्राईक घेतला. या चेंडूवर मानधना काहीही करू शकली नाही आणि तिला एलबीडब्ल्यू देण्यात आले पण नंतर रिव्ह्यूमध्ये तो बाद नसल्याचे दिसून आले. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे हा चेंडू देखील फुकट घालवला. त्यानंतर पुढच्याच चेंडूवर मानधनाला आणखी एक सिंगल घेता आली. आता आरसीबीला दोन चेंडूत ७ धावांची गरज होती. षटकाच्या पाचव्या चेंडूवर रिचाने आणखी एक धाव घेतली. यानंतर आरसीबीला विजयासाठी शेवटच्या चेंडूवर षटकाराची आवश्यकता होती, परंतु स्मृती मानधनाने तो हुकवला. एक्लेस्टोनने चमत्कार केले-यूपी विरुद्धच्या या सामन्यात, आरसीबीकडून एलिस पेरीने शानदार खेळी केली. पेरीने संघासाठी स्फोटक फलंदाजी केली आणि ५६ चेंडूत नाबाद ९० धावा केल्या. या डावात तिने ९ चौकार आणि ३ षटकारही मारले. या दमदार खेळीसह, एलिस पेरीने डब्ल्यूपीएलमध्ये ८०० धावा देखील पूर्ण केल्या. यूपी वॉरियर्सची फलंदाजी सामान्य राहिली तर संघाने नियमित अंतराने आपले विकेट गमावले. परंतु ९ व्या क्रमांकावर खेळण्यासाठी आलेल्या सोफी एक्लेस्टोनने केवळ १९ चेंडूत ४ षटकार आणि १ चौकार मारून खेळ पूर्णपणे बदलला आणि यूपीने सामना बरोबरीत आणला

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २६ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## श्री शिवाजी माध्य.आश्रमशाळा अंचरवाडीत शिव जयंती साजरी.



शिवजयंती च्या पावन पर्वावर दि. १९ फेब्रुवारी बुधवारी रोजी अंचरवाडी येथे उपस्थित मान्यवर व गावकरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केली .व प्रतिमा पुजन केले . यावेळी शिक्षक वृंद आणि विद्यार्थी हजर होते .श्री शिवाजी माध्यमिक आश्रम शाळा अंचरवाडी येथे छत्रपती शिवराय यांना अभिवादन करण्यास व प्रतिमा पूजन करण्यास आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री एस. डब्ल्यु चव्हाण यांनी शिव जयंती चे औचित्य साधून सकाळीच शिव प्रतिमा पूजन केले . या वेळी इंडियन पोलीस मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष समय कुमार जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत शिव जयंती सोहळा साजरा करण्यात आला . यावेळी त्यांनी छत्रपती शिवराय यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकला . उपस्थित शिक्षक वृंद यांनी . सुद्धा प्रतिमापूजन केले . त्यामध्ये आश्रम शाळेचे शिक्षक प्रशांत राठोड, एस .डी . चव्हाण सर एन पी राठोड, विखार सर, तसेच मयुर बुंदे, सह कर्मचारी बबन राठोड, भागवत जवंजाळ कैलाश जवंजाळ, ओ डी इंगळे,शालूबाई बोंडे, हरि गव्हाळे आदी उपस्थित होते .



*राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री मा.श्री.अजित दादा पवार साहेबांची भेट घेऊन दादांची प्रतिमा देऊन स्वागत करुन बीड मतदार संघातील विविध विकास कामा संदर्भात चर्चा करताना बीड पंचायत समितीचे सभापती *बळीराम आप्पा गवते यावेळी समवेत पंचायत समिती सदस्य सचिन नाना शेळके, युवक तालुका अध्यक्ष नंदकुमार कुटे, फय्याज पठाण सर आदी उपस्थित होते.

## केज तालुक्यात माऊली ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांची सभा रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ४-०० वाजता केज पंचायत समितीच्या सभागृहात पार पडली.सभेच्या अध्यक्षस्थानी केज पंचायत समितीचे माजी सभापती तथा स्वामी दयानंद प्रतिष्ठान केजचे संस्थापक अध्यक्ष अड. श्री.राजेसाहेब देशमुख यांची उपस्थिती होती. उपस्थित सर्वांच्या विचार विनीमयातुन केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संघटना स्थापन करण्याचे ठरले. ज्येष्ठ नागरिक श्री.गिन्यानदेव गदळे यांनी संघटनेचे नाव माऊली ज्येष्ठ नागरिक संघ असावे असे सुचविले उपस्थित अड. विजयकुमार कुलकर्णी यांनी नावास अनुमोदन दिले.केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनी संघटित होवून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्या साठी व त्यांच्या विविध उपक्रमांना विचारमंच मिळवून देण्यासाठी या संघटनेची निर्मिती करण्यात आली. कार्यकारिणी मध्ये संघटनेचे अध्यक्ष म्हणून अड.श्री.राजेसाहेब देशमुख,श्री. गिन्यानदेव गदळे,सचिव,श्री. रामेश्वर जाजु,कोषाध्यक्ष,श्री. कापरे,उपाध्यक्ष,अड. विजयकुमार कुलकर्णी, कार्याध्यक्ष,श्री. साखरे सहसचिव,श्री.मधुकरराव लांडगे सहसचिव व सर्व सदस्य श्री.लक्ष्मणराव यादव,श्री.उद्धवराव तरकसबंद,श्री.लक्ष्मणराव जाधव,श्री. वासुदेवराव डोंगरे आदींचा समावेश आहे.या कार्यकारिणीस श्री.रमेशराव खंदारे,प्रा. हनुमंतराव भोसले,श्री. रामराव राऊत,श्री. वल्लभदास जाजु,श्री. रामचंद्र जाधव,श्री.प्रदिप कल्याणकर यांनी अनुमोदन दिले.माऊली ज्येष्ठ नागरिक संघाची वरिष्ठ कार्यालयात नोंद करणे व इतर आवश्यक कार्यवाहीचे सर्व अधिकार नवनिर्वाचित कोषाध्यक्ष श्री.रामेश्वर जाजु यांना सर्वांच्या संमतीने देण्यात आले.ज्येष्ठनागरिकांसाठी विचारमंच निर्माण करणे व त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा उपयोग संघटने च्या माध्यमातुन समाजाचे वैचारिक,राजकीय, सांस्कृतिक वातावरण सुधारण्यासाठी कल्पवृक्षाचे काम करावे असा निर्धार संघटनेने केला.कार्यक्रमाचे सुत्र संचालनप्रा.हनुमंतभोसले यांनी केले.

## टीसी हरवली

माझी कोमलताई वसंतराव लोहकरे या नावाची इयत्ता बारावी पास ची टीसी काटकळंबा ते नांदेड प्रवास करत असतांना हरवली आहे.
सापडल्यास संपर्क करणे.

-: संपर्क :-
कोमलताई वसंतराव लोहकरे
रा.काटकळंबा ता.कंधार जिल्हा नांदेड
मो.७७९८९०५३३१

# बीड जिल्हयात दशहत निर्माण करणाऱ्या केजच्या ४ गुंडाना पोलीस अधिक्षकांनी केले हद्दपार

बीड ।प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील चार गाव गुंड व त्यांच्या टोळीवर शरीरा विरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, जिवेमारण्याच्या धम्मक्या देणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणारे, लोकांना मारहाण करुन जखमी करुन, गुंडगिरी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणे असे गुन्हे दाखल असल्याने व त्यांची जनतेमध्ये दहशत निर्माण होत असल्याने सदर टोळीच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा पांग करण्यासाठी त्यांचे टोळी विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी थेट जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे.या कारवाईने आता बीड जिल्ह्यात गुंडगिरी दहशत निर्माण करणाऱ्या गुंडांमध्ये जबर चपराक बसणार आहे. बीड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी बीड जिल्हयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, खुन व खुनाचा प्रयत्न, दंगा, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगार व लोकांना मारहान करुन गंभीर जखमी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणारे बीड जिल्हयातील गुन्हेगारावर पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉंवत यांची करडी नजर आहे. असे गंभीर गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळयावर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी त्यांचे विरुध्द जास्तीत जास्त उचित प्रतिबंधक कारवाया करणे बाबत पो. स्टे. प्रभारी अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत.पो.स्टे. प्रभारी अधिकारी केज श्री. प्रशांत महाजन यांनी बीड व लगतचे जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे इसम १. अजय अशोक तांदळे वय २३ रा. कोरेगांव ता. केज जि.बीड २. विकास सुभाष सावंत वय २८ रा.सावंतवाडी ता. केज जि.बीड ३. सोमनाथ राजाभाऊ चाळक वय २२ रा. लक्हुरी ता. केज जि.बीड ४. बालाजी राम लांब वय १९ रा. कोरेगांव ता. केज जि.बीड यांचे टोळीवर शरीरा विरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, जिवेमारण्याच्या धम्मक्या देणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणारे, लोकांना मारहाण करुन जखमी करुन, गुंडगिरी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणे असे गुन्हे दाखल असल्याने व त्यांची जनतेमध्ये दहशत निर्माण होत असल्याने सदर

## निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली ; छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील तुटलेल्या जिमच्या साहित्याची स्वखर्चाने दुरुस्ती :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२५ ) बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणांवर सकाळी आणि सायंकाळी व्यायाम करण्यासाठी येणा-या नागरिकांना नगरपरिषद प्रशासनाने बसवलेले साहित्य मोडकळीस आले होते यामुळे व्यायाम करणारांची हेळसांड होत होती. मोडकळीस आलेल्या जिमच्या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे व त्यांच्या सहका-यांनी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासकीय ध्वजारोहणा साठी आलेले



क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले होते. निवेदन अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नरेंद्र कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत लेखी कळवले होते. मात्र नेहमीप्रमाणेच नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. व्यायाम ासाठी येणा-या नागरिकांची हेळसांड लक्षात घेऊन ङ्गगुड मॉर्निंग ङ्ग ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत आणि स्वखर्चाने सगळ्या साहित्यांची दुरुस्ती करून घेतली. त्यामुळे एकंदरीतच निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. गुड मॉर्निंग ग्रुपच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.सविस्तर माहितीस्तव

बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सकाळी आणि सायंकाळी नागरीकांची गर्दी असते.व्यायामाच्या दृष्टीने अनेक नागरिक याठिकाणी येतात.अशा नागरीकांसाठी व्यायाम करण्यासाठी काही वर्षापुर्वी ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले होते. या साहित्याची कित्येक महिन्यांपासून मोडतोड झालेली होती.अनेक साहित्य मोडकळीस आलेले होते. त्यामुळे व्यायामासाठी आलेल्या नागरीकांची हेळसांड होत होती. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या सहका-यांनी नगरपरिषद प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे मोडकळीस आलेल्या साहित्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती.मात्र नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले होते. गुड गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी ही बाब लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने तुटलेल्या जिमच्या साहित्याची वेल्डिंगने दुरुस्ती केली.यासाठी अँड.चंदुभाऊ जटाळ, जयदत्त थोटे,शरद जवळकर, अँड.शिवाजी साळवे,राजुशेठ गोरे, घोगरे , संतोष पवार, दिनेश गुरखुदे, जितेंद्र कासट, आनंद बाहेती, किशोर कागदे,अलीमभाई, सुर्यवंशी, ढाकणे, अंकुश निर्मळ, अशोक सुरवसे, वानखेडे, मुकेश भस्मारे, कोठारी, मिसाळ,बाळु निकम,असत पटेल,राजु दळवी यांनी मोलाचे योगदान दिले

## शासनाच्या लोककला परिसंवादास प्रा.राम प्रसाद तौर प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख तथा ज्येष्ठ लोकसाहित्य अभ्यासक प्रा. डॉ. रामप्रसाद तौर यांना दिनांक १ मार्च रोजी बालगंधर्व नाट्यगृह मिरज येथे राज्यशासनाच्या सांस्कृतीक कार्य विभाग व सांस्कृतिक संचालनालय द्वारा आयोजित लोककला परिसंवाद मध्ये ङ्गपारंपारीक लावणीचे बदलते स्वरुपङ्ग यां विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.



किनवट सारख्या दुर्गम व आदिवासी भागात राहुन माय मराठीची सेवा करत असलेले प्रा. तौर यांना शासनाच्या परिसंवादामध्ये आमंत्रित केल्याने हि किनवट तालुक्या करिता अभिमानाची बाब आहे. प्रा. तौर हे सदर परिसंवादाचे प्रमुख वक्ते असुन त्यांच्या सोबत प्रा. डॉ गणेश चंदणशिवे मुंबई विद्यापिठ लोककला अकादमी प्रमुख व खंडुराज गायकवाड मंत्रालयातील पत्रकार यांचे देखिल व्याख्यान होणार आहे. आयोजित परिसंवाद हा प्रा. प्रकाश खांडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असुन यामध्ये राज्याचे सांस्कृतिक मंत्री अड. आशिष शेलार यांची देखिल उपस्थिती राहणार आहे.

## शिव सेना शिव जयंती अध्यक्षपदी शिनगारे, सचिवपदी धुमाळ यांची निवड.

किल्ले धारूर (प्रतीनीधी) शिव सेना (शिंदे गट)शिव जयंती (तिथी प्रमाणे) दर वर्षी साजरी केली जाते.प्रती वर्षा प्रमाणे शिव सेना शिव जयंती उत्सव समितीची बैठक शिव सेना तालुका प्रमुख नारायण कुरुंद यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सर्वानुमते उत्सव समिती अध्यक्षपदी प्रशांत शिनगारे यांची निवड करण्यात आली तर सचिवपदी संदेश धुमाळ यांची निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्ष पदी विजय



बारस्कर, सहसचिव पदी प्रताप तिबोले,मिरवणुक प्रमुख म्हणून ज्ञानेश्वर किर्दक, दादा नेरकर,रुपेश मेहरकर,सोमनाथ शिनगारे, अनंत चिंचाळकर, नितिन भैय्या सह्विाल, सोमनाथ सक्राते, गोविंद पांचाळ, गणेश पवार, बालाजी शिंदे राधेश्याम रहेकवाल आदिंची निवड करण्यात आली.यावेळीअभिजीत कुरुंद, राहुल बोराडे,कुंदन शुक्ला,मुन्ना फावडे, श्रीकांत चव्हाण,जनक फुन्ने,प्रदिप चव्हाण,कृष्णा लोखंडे,सय्यद रियाज, विशाल गुन्नालसह शिव सैनिक शिवप्रेमी उपस्थित होते

# ना. पंकजाताई मुंडे यांचे परळीला नवीन वर्षाचं पहिलं गिफ्ट

## पशुवैद्यकीय महाविद्यालयास मिळाली कॅबिनेटची मंजूरी



मुंबई ।प्रतिनिधी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळी मतदारसंघाला महाशिवरात्री व नवीन वर्षाचं पहिलं गिफ्ट दिलं आहे. परळी येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिला असून यासाठी ५६४ कोटी ५८ लाख रूपयांच्या तरतूदीस मंजूरी दिली आहे.

ना. पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन मंत्री झाल्यानंतर सर्वात प्रथम त्यांनी जिल्ह्यात परळी येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून आपल्या विकासाभिमुख कामाची चुणूक दाखवून दिली. त्यांनी दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर यांच्या टीमने ९ फेब्रुवारी रोजी परळी शहरातील मेरू पर्वतावर आणि लोणी येथे यासाठी जागेची पाहणी केली होती व तसा अहवाल शासनाकडे सादर केला होता. महाविद्यालय स्थापन होण्याकरिता लागणाऱ्या मुलभूत सोयी सुविधा, पाण्याची उपलब्धता तसेच इतर आवश्यक बाबी या दोन्ही ठिकाणी सहजपणे उपलब्ध असल्याने महाविद्यालय स्थापन करण्याकरिता कसलीही अडचण येणार नाही असे संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाला कळवले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उप मुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत परळी येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास मंजूरी देण्यात आली, त्यासाठी ५६४ कोटी ५८ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# उपक्रमशील शिक्षक व एनसीसी ऑफिसर श्री विश्वनाथ पांचाळ सर

## यांना राज्यस्तरी आदर्श शिक्षक पुरस्कार.

गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये गेली ३३ वर्षे कार्यरत असून विविध शैक्षणिक उपक्रमात भाग घेऊन अनेक पारितोषिक ही मिळवलेली आहेत. लोकसंख्या शिक्षण या उपक्रमाची राज्यस्तरावर निवड झाली होती. राष्ट्रीय छात्र सेनेच्या ,(छउउ) माध्यमातून स्वच्छ भारत अभियान, साक्षरता अभियान, पर्यावरण रक्षण, तंबाखू मुक्त अभियान, हेल्मेट वाटप प्लास्टिक बंदी, कापडी पिशव्यांचा वापर , मतदार जनजागृती , स्वच्छ नदी अभियान,रस्ता सुरक्षा अभियान , संविधान दिन , स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ,माझी माती माझा देश, युद्ध नौका भेट, कारगिल विजय दिवस असे विविध उपक्रम ातून भावी आदर्श सैनिक घडविण्याच्या प्रयत्न करीत आहे . आज अनेक कॅडेट भारतीय सैन्याचा भरती झालेले आहेत. शाळेत सहशालेय विविध चित्रकला स्पर्धा ,फलकलेखन, करोना काळातील शैक्षणिक साहित्य वाटप, किराणा वाटप, लशीकरण मोहीम,अशा



विविध सामाजिक उपक्रमाव्दारे सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करत आहेत. ताराबाई मोडक अध्यापक विद्यालय माजी विद्यार्थी संघ आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन्माननीय जयश्रीताई घैसास माजी शिक्षिका, प्रसिद्ध विनोदी अभिनेते हास्य सम्राट फेम जॉनी रावत सर , विजय



गायकवाड सर ताराबाई मोडक अध्यापक विद्यालय दादर प्राचार्य यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.शाळेतील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी शिक्षक , पर्यवेक्षक ,मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनी या पुरस्काराबद्दल सरांचे अभिनंदन केले आहे.

## उज्वल व्यसनमुक्ती केंद्र साकोली अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती शिबिराचे आयोजन



राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंती निमित्य एकलव्य ढीवर समाज विकास मंडळ ग्राम डोंगरगाव /साक्षर येथे दि. २३/२/२०२५ रोजी जि. प. प्राथ. शाळेच्या पटांगनावार व्यसनमुक्ती जनजागृती करून व्यसनमुक्त समाज निर्मिती कशी होईल, किशोरवयीन मुलांना लागणारे व्यसन सोडविण्यात पालकांची भूमिका काय?, व्यसनमध्ये होरपडत चाललेला तरुण व त्याचे होणारे दुष्परिणाम, बेरोजगारी व व्यसनमुळे उद्भवणारे विविध आजार या बाबत याबाबत मा. उषा घोडेस्वार यांनी जनजागृती केली.

सदर कार्यक्रमासाठी मुखतः कार्यक्रमाचे सूत्रधार मा. दिपकजी मेश्राम व म. पो. होमराजजी मेश्राम यांचे विशेष सहकार्य लाभले.

या जनजागृत्ती शिबिरात संस्थेचे अध्यक्ष मा. गंगाधरजी धुवाधपारे, उपाध्यक्ष मा. शिलवंत घोडेस्वार, मा. जनार्धनजी नागपुरे, मा. दिशा गेडाम, मा. लोकेश नगरे, मा. उमेशभाऊ दोनोडे, मा. यशवंतजी पचारे, मा. नंदेश्वरजी मेश्राम, मा. अशोक शेंडे व समस्त गावकरी उपस्थिती होते. उषा घोडेस्वार यांनी व्यसनमुक्ती बाबत प्रबोधन करून व्यसनामुळे कुटुंब व समाजात प्रतिष्ठा कशी नाश पावत आहे हे सांगितले. काही रुग्ण मित्रांनी आपले मनोगत व्यक्त करून आपण व्यसन करण्याचा पश्चाताप व्यक्त केला. स्वच्छता, आरोग्य व व्यसनमुक्त जीवन असा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

सर्वांच्या सहकार्याने हा जनजागृत्ती कार्यक्रम अतिशय उत्कृष्ठ रित्या हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

## शेतकऱ्यांनी ईपिक पाहणी मुदतीत करून घ्यावी :-तहसीलदार वैभव महिंद्रकर

वडवणी ।प्रतिनिधी वडवणी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई- पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज आपल्या गावचे ग्राम महसूल अधिकारी यांचे सहायक मार्फत करण्यात येत असून शेवटची तारीख दिनांक २८.०२.२०२५ आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी ज्यांची पीक पाहणी झाली नाही अशांनी ती सहाय्यक व्दारे लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे. वडवणी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई- पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज आपल्या गावचे ग्राम महसूल अधिकारी यांचे सहायक मार्फत करण्यात येत असून शेवटची तारीख दिनांक २८.०२.२०२५ आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी ज्यांची पीक पाहणी झाली नाही अशांनी ती सहाय्यक व्दारे लवकरात लवकर करून घ्यावी तसेच ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे सुरू आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) काढणे अनिवार्य आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजना, पीक विमा, नैसर्गीक आपत्ती अनुदान, पिक कर्ज व इतर शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीस योजनांचा लाभमिळणार नाही याची नोंद घ्यावी. शेतकरी ओळख क्रमांक काढण्यासाठी आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक तसेच शेतीचा गट क्रमांक माहीत असणे आवश्यक आहे. तरी सर्व शेतकरी बंधू भगिनींनी लवकरात लवकर आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र, महा ई सेवा केंद्र येथे संपर्क करून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.

# परळीत अवैध दारु वाहतुकीवर पोलीसांची दणकेबाज कारवाई

### देशी विदेशी दारुची चोरटी वाहतुक रोखली

बीड ।प्रतिनिधी परळी येथून एका इंडिका कारमधून अवैध दारू चोरट्या मार्गाने घेऊन जात असलेल्या मिळालेल्या गुप्त माहितीवरून परळी पोलिसांनी पाठलाग करून सदरील गाडी ताब्यात घेत याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे पोलिसांच्या या कारवाईने अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ०४:०० वाजेच्या सुमारास परळी शहर पोलीसांना गोपनीय माहीती मिळाली की, एक इसम हा त्याच्याकडील टाटा इंडीका कारमधुन अवैध दारुची वाहतुक करीत असल्याची माहीती मिळाली होती. मिळालेल्या माहीतीची खात्री करण्यासाठी परळी शहरचे पथक शासकीय वाहनाने रवाना झाले असता, अंबाजोगई रोडकडुन एक चारचाकी येतांना पथकाला दिसली. पोलीसांनी सदर वाहनास थांबवीण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांना पाहुन सदर इसम हा त्याची कार घेवून पळू लागला. त्यावेळी परळी शहरच्या पथकास सदर वाहनावर संशय बळावल्याने त्यांनी सदर वाहनाचा पाठलाग केला असता सदर इसम याने ४:३० वाजच्या सुमारास परळी शहरातील आझाद चौकात त्याच्याकडील टाटा इंडीका कार सोडुन पळुन गेला, पोलीसांनी सदर गाडीची झडती घेतली असता सदर टाटा इंडीका कार क्रमांक चक २३ ६५८० मध्ये देशी विदेशी दारुचे एकूण २१ बॉक्स मिळून आले. पोलीस पथकाने रुपये १,१४,३३६०/-किंमतीचे देशी विदेशी दारुचे २१ बॉक्स व रुपये



३,००,०००/- किंमतीची टाटा इंडीका कार क्रमांक चक २३ ६५८० असा एकुण ४,१४,३६०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस स्टेशन परळी शहर येथे टाटा इंडीका कारच्या चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला असुन तपास परळी शहर पोलीस करीत आहेत.

# बीड जिल्हाधिकाऱ्यांसह कार्यकारी अभियंत्याचे वॉरंट जारी

## बीडच्या दिवाणी न्यायालयाचा आदेश;लघू पाटबंधारे प्रकल्प प्रकरण

बीड । किसान न्युज भूसंपादनाच्या मावेजासाठी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांचे वाहन जप्त करण्यात आल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. ही घटना ताजी असतानाच आता अशाच एका प्रकरणात थेट जिल्हाधिकारी आणि लघु पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना अटक करण्याचे आदेश देण्यात आलेत. बीडच्या दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर एस. एस. पिंगळे यांच्या न्यायालयानं हे आदेश दिले आहेत. तसंच न्यायालयानं या संदर्भातील वॉरंटही जारी केलंय. नेमकं काय आहे प्रकरण? : जिल्ह्यातील शेतकरी राजेश पोकळे यांची जमीन लघु पाटबंधारे विभाग स्थानिक स्तर बीड यांच्या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली होती. त्याचा मावेजा देण्याचे आदेश २०१८ मध्ये देण्यात आले होते. मात्र, त्याची पूर्तता अद्यापही





झालेली नाही. त्यामुळं १३ लाख १९ हजाराच्या मावेजासाठी शासनाच्या वतीनं बीडचे जिल्हाधिकारी आणि लघु पाटबंधारे विभाग स्थानिक स्तरचे कार्यकारी अभियंता यांना कैद करून, त्यांच्याकडून मावेजाची रक्कम भरणा करून घ्यावी, या आदेशाचे वॉरंट बीडच्या दिवाणी न्यायालयानं जारी केले आहेत. या वॉरंटची अंमलबजावणी २१ मार्चपूर्वी करावी, असंही यात नमूद करण्यात आलंय. दरम्यान, या आदेशामुळं जिल्ह्यात एकच खळबळ उडाल्याचं बघायला मिळतंय.

### दिवाणी कैद म्हणजे काय?

मधनकोफ म्हणजे ज्याचे पैसे येणे आहेत ती व्यक्ती असते. तर अशी व्यक्ती मऋणकोफ अर्थात कर्जदाराच्या दिवाणी अटकेची मागणी करते. त्यासाठीचा भत्तादेखील धनको न्यायालयात भरते. ऋणकोला कैद केल्यानंतर त्याच्या खाण्याचा आणि इतर भत्ता धनकोमार्फत केला जातो. जेव्हा कर्जदार न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यात अयशस्वी ठरतोयाचाच अर्थ असा की, जिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंतांना अटक करून त्यांचा निर्वाह भत्ता हे राजेश पोकळे भरणार आहेत

# निलम गोऱ्हे यांच्या निषेधार्थ बीडमध्ये निदर्शन





बीड ।प्रतिनिधी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना व शिवसेना महिला आघाडीच्या वतीने निलम गोऱ्हेच्या प्रतिमेस जोडे मारुन तीव्र निषेध करण्यात आला.शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने मराठवाडा संपर्क नेते सुनिलजी प्रभू, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब , महिला आघाडीच्या जिल्हा संपर्कप्रमुख संपदाताई गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वाखाली,महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले यांच्या पुढाकाराने,शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरील जोडे मारो आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आले. यावेळी बोलताना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन व महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले यांनी सांगितले की, ज्या निलम गोऱ्हेकडे स्वतः ची स्कुटी बसायला नव्हती त्या निलम गोऱ्हेला ४ वेळा मातोश्रीने आमदारकी बहाल केली तिच निलम गोऱ्हे नमकहरामी निघाली. मातोश्रीने आतापर्यंत कित्येकांना रस्त्यावरचे मर्सिडीज गाडीवर बसवले आहे, शेकडो लोकांना खासदारकी , आमदारकी , मंत्रीपदे दान केलेली आहेत, सर्वसामान्य गरिबांच्या पोरांना जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख केलेले आहे , मातोश्रीने कुणाकडूनही एक रुपया कधी घेतला नाही ,अशा मातोश्रीवर गरळ ओकणे हास्यास्पद आहे असे सांगितले यावेळी उपतालुकाप्रमुख अशोक सगळे, उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे,कामगार नेते रविअणणा वाघमारे, अर्जुन येवले ,मनिषाताई मुंढे,आशाताई कानडे,छाया धुताडमल, ज्योती डोळस ,प्रयागा वाघमारे,विमल धुताडमल , मनिषा कदम ,लंकाताई ठोंबरे,कांता घाडगे,कालिंदा घाडगे यांच्यासह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत

# खरपुडी येथे सिडकोचा वादग्रस्त प्रकल्प

## शेतकऱ्यांचे नुकसान, आर्थिक हितसंबंध आणि पारदर्शकतेचा अभाव

जालना ।प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाने जालना जिल्ह्यात खरपुडी येथे सिडकोने नवीन प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असून, या संदर्भात मागील काही वर्षांत विविध प्रशासकीय आणि आर्थिक टप्प्यांवर निर्णय घेतले गेले आहेत. तथापि, या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.सदर प्रकल्पाची संकल्पना सन २०१८ मध्ये सिडकोने मांडली होती. त्यानंतर ऐपीर्पी र्धीपस या आंतरराष्ट्रीय संस्थेची नियुक्ती करून प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यात आला. दिनांक १० जानेवारी २०२० रोजी प्रस्तुत केलेल्या अहवालात सदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर शासनाने दिनांक ९ जुलै २०२० रोजी हा प्रकल्प निरधिसूचित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, २०२२ आणि २०२३ मध्ये सिडको व शासनाकडून या प्रकल्पाच्या पुनरावलोकनास सुरुवात झाली आणि नवीन घझचऋ अहवालाच्या आधारे २०२४ मध्ये प्रकल्पास अंतिम मान्यता देण्यात आली. पूर्वी अव्यवहार्य ठरलेला प्रकल्प काही वर्षांतच व्यवहार्य कसा काय ठरतो? नवीन आणि जुन्या अहवालांमध्ये काय तफावत आहे? हे शासनाने पारदर्शकपणे स्पष्ट करणे गरजेचे होते, परंतु त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे. तसेच, या प्रकल्पाच्या मंजुरीपूर्वीच काही व्यावसायिकांना संबंधित अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय माहिती देण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या व्यावसायिकांनी शेतकऱ्यांकडून अत्यल्प दराने जमीन विकत घेऊन त्या जमिनींचे नंतर निवासी क्षेत्रात रूपांतर करण्यात आले. परिणामी, मूळ शेतकरी व भूधारक आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत.याशिवाय, या प्रकल्पाच्या मंजुरी प्रक्रियेत अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या आहेत. आधीच अव्यवहार्य ठरलेल्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी निधी खर्च करणे योग्य नाही. हा निधी इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी वापरणे अधिक हिताचे ठरेल. स्थानिक जनतेचा या प्रकल्पास तीव्र विरोध असूनही, काही अधिकारी आणि व्यावसायिकांचे आर्थिक हितसंबंध असल्याने हा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे.सदर प्रकल्पासाठी २४७ हेक्टर जमीन संपादित करायची असून, त्यामध्ये ५० गटांचा समावेश आहे. आतापर्यंत २० गटांतील ११९ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करून दर निश्चित करण्यात आले आहेत. उर्वरित ३० गटांपैकी १६ गटांची मोजणी अंतिम टप्प्यात असून, १४ गटांची मोजणी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.या पार्श्वभूमीवर, सदर प्रकल्पाच्या मंजुरीसंदर्भात घेतलेल्या निर्णयाची उच्चस्तरीय चौकशी करून हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात यावा. तसेच, शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# पालकमंत्री अजितदादांच्या प्रयत्नांमुळे महिन्याभरातंच मिळाली पुणे आणि बीड जिल्ह्याला दोन नवीन पशुवैधकीय महाविद्यालये

### बारामती, परळी पशुवैद्यकीय महाविद्यालयांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता अजितदादांच्या घोषणेनंतर महिन्याभरातंच मंजूरी

मुंबई, दि. २५ :- उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. मागील जानेवारी महिन्यात बारामती येथे आयोजित ङ्गकृषिक-२०२५फ प्रदर्शनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती आणि बीड जिल्ह्यात परळी येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर महिन्याभरातच सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन त्या प्रस्तावांना आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रशासकीय कौशल्य आणि कामाचा झपाटा पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून शेतीच्या बरोबरीनं पशुधनाचा विकासही महत्वाचा आहे. आज मंजूरी मिळालेल्या बारामती आणि परळी येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमुळे पशुपालकांना अत्याधुनिक, दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणार असून, राज्यात प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची काळजी आणि विकासासाठी ही पशुवैद्यकीय महाविद्यालये महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.



**बारामती मकृषिक २०२५ प्रदर्शनातील घोषणा महिनाभरात पूर्ण**

बारामती येथे जानेवारी २०२५ महिन्यात आयोजित मकृषिक-२०२५फ कृषी प्रदर्शनात, शेतकरी आणि पशुपालकांनी बारामतीमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी केली होती. या मागणीला तातडीने प्रतिसाद देत ही महाविद्यालये स्थापन करण्यात येतील, अशी घोषणा अजितदादांनी सभेत केली होती. त्यानंतर महिन्यातच अजितदादांनी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून दिली. बारामतीतील क-हावागज येथे ८२ एकर आणि परळीच्या लोणी येथे ७५ एकर जागेवर ही शासकीय महाविद्यालये उभारली जाणार आहेत.

**पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळणार** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे ध्येय ठेवले आहे. यासाठी शेती आणि शेतीपुरक व्यवसायांना चालना देण्याची गरज ओळखून, पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सध्या राज्यात पशुवैद्यकीय सेवा आणि पशुवैद्यकांची मोठ्या प्रमाणावर गरज असून, नवीन महाविद्यालयांमुळे प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढेल आणि राज्यभर पशुसंवर्धन सेवा अधिक भक्कम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.**प्रत्येकी २३४ नियमित, ४२ मानधनावरील पदांना मान्यता**

या शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी मोठ्या प्रमाणात पदनिर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक महाविद्यालयासाठी शिक्षक संवर्गात ९६, शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी १३८ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याशिवाय, बाह्यस्त्रोतांद्वारे प्रत्येकी ४२ पदे मानधन तत्त्वावर भरण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**महाविद्यालयांसाठी १०९२ कोटींची आर्थिक तरतूद**

बारामती आणि परळी येथील म हाविद्यालयांसाठी एकूण १०९१.५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. बारामतीच्या महाविद्यालयासाठी ५६४.५८ कोटी रुपये तर परळीच्या महाविद्यालयासाठी ५२६.८० खर्च होणार असून, या निधीतून प्रगत संशोधन केंद्रे, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि आधुनिक सुविधा उभारल्या जातील.

**पशुपालकांचा आनंद, राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत**

या निर्णयामुळे राज्यातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, अत्याधुनिक पशुवैद्यकीय सुविधा अधिक सुलभ होतील. विशेषतः, बारामती आणि परळी परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा निर्णय कृषिपूरक व्यवसायांना चालना देईल आणि राज्यातील पशुधन संगोपनासाठी नव्या संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मार्ग मोकळा करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

अजितदादांची आणखी एक महत्वपूर्ण काम गिरी!

राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तसेच पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिन्याभराच्या अतिशय कमी वेळात हा लोकोपयोगी निर्णय मंजूर करून घेतला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील पुणे व बीड जिल्ह्यासह राज्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com